REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थींची आर्थिक स्थिती: एक अध्ययन

तथागत प्रल्हाद गजभिये[1] , डॉ.प्रदीप हाडके[2]
[1]संशोधनकर्ता, सहा.प्राध्यापक (वाणिज्य विभाग)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय सुरतोली/लोहारा ता.देवरी जिल्हा गोंदिया.
[2] मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग, धनवटे नेशनल कॉलेज नागपूर.

## सारांश

प्रस्तुत अध्ययनात गोंदीया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील एकुण ५०० आदिवासी लाभार्थ्यांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले. संकलित केलेली माहिती विभागवार वर्गीकृत करण्यात आली. प्रत्येक सारणी खाली त्या सारणीतील माहितीचे स्पष्टीकरण देण्यात आले व स्पष्टीकरणांती परिणाम देखील प्रस्तुत करण्यात आले.



## प्रस्तावना

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात धर्म, भाषा, वंश, पंथ, कुळ, परंपरा इत्यादी बाबत मोठ्या प्रमाणात विविधता आढळून येते. त्यामुळेच मोठ्या प्रमाणात समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्रज्ञ यातील रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. सुमारे १० लाख वर्षापूर्वी पृथ्वीवर मानवाची निर्मिती झाली असा दावा जीवशास्त्रज्ञ करतात. तेंव्हापासून ते आतापर्यंत मानवाची विकासाच्या दृष्टिकोनातून वाटचाल सुरू आहे. परंतु मानव समाजाच्या विकासाच्या स्थितीकडे बघीतले असता असे आढळून येते की, एकिकडे फार थोड्या मानव समाजाने विकासाचे उच्च शिखर गाठले आहे, तर दुसरीकडे असे चित्र आढळून येते की, मोठ्या संख्येने असणारा मानव समाज आज विकासापासून वंचित आहे. त्यांना आपल्या गरजांची देखील पुर्तता योग्य पद्धतीने करता येत नाही. असाच एक मानव त्यांना आपल्या गरजांची देखील पुर्तता योग्य पद्धतीने करता येत नाही. असाच एक मानव समाज जागतिक स्तरावर आदिवासी किंवा आदिवासी जमात म्हणून ओळखला जातो. भारतातदेखील मोठ्या संख्येने आदिवासी जमात आढळून येते. विकासाच्या बाबतीत ही जमात आजही मोठ्या प्रमाणात मागे आहे. विकासाच्या योजना राबविल्यानंतर त्यांच्या विकासामध्ये काय बदल झाला याचे अध्ययन महत्वाचे ठरते.

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासी विकासाच्या बाबत मोठ्या प्रमाणात सरकारी प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यामुळे आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक,

शैक्षणिक, सांस्कृतीक, राजकीय जीवनात फारसे परिवर्तन झाले नाही. किंबहुना विकासाच्या प्रवाहापासून अनेक वन्य जमाती अद्यापही दूर आहेत. त्यामध्ये गोंड, कोरकू, पारधी, आंध, कोलाम, परधान, हलबी, खारीया, महादेव कोळी इत्यादी वन्य जमातींचा समावेश होतो.

भारतामध्ये आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समुहांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. आदिवासी या संज्ञेत आदिवासी जाती, वनवासी, गिरीजन, वन्य जाती या संज्ञा समाविष्ट आहेत. भारतात ४६१ आदिवासी जमातींना अनुसूचित जमातीचा दर्जा प्राप्त झाला आहे. सन २०११ च्या जनगणनेनूसार संपूर्ण भारतात एकूण लोकसंख्येच्या ८.६% आदिवासींची लोकसंख्या आहे. आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्र हा देशपातळीवर सहाव्या क्रमांकावर आहे. राज्यात एकुण लोकसंख्येच्या ९.४% आदिवासींची लोकसंख्या आहे.[१] राज्यातील इतर आदिवासी जमातीपैकी आंध, महादेव कोळी, पारधी इत्यादी आदिवासी जमाती हिंगोली जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येतात. यामध्ये आंध जमातीची संख्या जास्त आहे.

अभ्यासाच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत प्रकरण दोन भागामध्ये विभागण्यात आले आहे. त्यामध्ये 'भाग –अ' मध्ये आदिवासी जमाती, आदिवासींच्या व्याख्या, भारतातील आदिवासी जमाती, आदिवासींची लोकसंख्या इत्यादींचा अभ्यास करण्यात आला आहे. तर 'भाग –ब' मध्ये आंध जमात, त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक स्थिती तसेच आदिवासींच्या समस्या इत्यादींचा अभ्यास करण्यात आला आहे.

**सारणी क्रमांक १ : गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थींच्या आर्थिक स्थितीसंबंधी माहिती**

| आर्थिक स्थिती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | – | – |
| सामान्य | २८९ | ५७.८ |
| निम्न | २११ | ४२.२ |
| **एकूण** | ५०० | १०० |
| **Chi-square** | **df** | **Sig.** |
| **268.263** | **2** | **0.000** |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थींच्या लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीवरून ५७.८ टक्के लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सामान्य स्वरुपाची असून ४२.२ टक्के लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती निम्न स्वरूपाची असल्याचे निदर्शनास आले. मनरेगा लाभार्थ्यांची त्यांच्या आर्थिक स्थितीच्या आधारावर तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (Chi-Square 268.263, df = 2, $P < 0.05$) फरक आहे. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, आर्थिक स्थिती सामन्य स्वरुपाची असलेल्या लाभार्थ्यांची संख्या इतर लाभार्थ्यांच्या तुलनेत महत्वपूर्ण अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या रोजगारचा सुधारित आर्थिक ज्ञानावर होणाऱ्या परिणामाबाबत माहिती**

| मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारचा सुधारित आर्थिक ज्ञानावर परिणाम | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| लक्षणीय वाढ | १२३ | २४.६ |
| सामान्य वाढ | २१३ | ४२.६ |
| काही प्रभाव नाही | १६४ | ३२.८ |
| **एकूण** | ५०० | १०० |
| **Chi-square** | **df** | **Sig.** |
| **24.365** | **2** | **0.000** |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या रोजगारचा सुधारित आर्थिक ज्ञानावर होणाऱ्या परिणामाबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४२. ६ टक्के लाभार्थ्यांच्या सुधारित आर्थिक ज्ञानात मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारामुळे सामान्य वाढ झाली असून ३२.८ टक्के लाभार्थ्यांच्या सुधारित आर्थिक ज्ञानात मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारामुळे काही प्रभाव झाला नाही. तर २४.६ टक्के लाभार्थ्यांच्या सुधारित आर्थिक ज्ञानात मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारामुळे लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले.

गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या रोजगारचा सुधारित आर्थिक ज्ञानावर होणाऱ्या परिणामानूसार लाभार्थ्यांदरम्यान सार्थक (Chi-Square 24.365 df = 2, $P < 0.05$) फरक आहे. म्हणेजच गोंदिया जिल्ह्यातील महत्वपूर्णपणे अधिक लाभार्थ्यांच्या सुधारित आर्थिक ज्ञानात मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारामुळे सामान्य वाढ झाली.

## निष्कर्ष

गोंदिया जिल्ह्यातील लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सामन्य स्वरूपाची आहे. गोंदिया जिल्ह्यातील महत्वपूर्णपणे अधिक लाभार्थ्यांच्या सुधारित आर्थिक ज्ञानात मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारामुळे सामान्य वाढ झाली.गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा योजनेतील आदिवासी लाभार्थ्यांचे वय, आर्थिक स्थिती, सामाजिक सहभाग व आरोग्य किंवा स्वास्थ्य त्यांच्या मनरेगांतर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगारातील सहभागाला महत्वपूर्णपणे प्रभावित करतात. लाभार्थ्यांना मनरेगा योजनेतंर्गत दिल्या जाणाऱ्या रोजगाराचा त्यांच्या जीवनावर सामान्य प्रभाव झाला. आदिवासी स्त्रियांच्या रोजगार स्थितीमध्ये सामान्य वाढ झाली. लाभार्थी मनरेगाच्या रोजगार योजनेमुळे स्त्रियांच्या समाजार्थिक स्थितीमध्ये बदल होण्याबाबत अनिश्चित आहेत. गोंदिया जिल्ह्यातील मनरेगा लाभार्थी स्त्रियांच्या सामाजिक–आर्थिक स्थितीमध्ये सामान्य बदल झाला आहे.

## संदर्भ ग्रंथसुची

१. कुलकर्णी शौनक (२००९),'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
२. तेगमपूरे मारोती (२००९),'आदिवासी विकास आणि वास्तव्य', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद,
३. आगलावे प्रदिप (२०१०),'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'. श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४. जमादार ए. एच. (१९९६). 'आदिवासी एंव उपेक्षीत जन', विकास प्रकाशन, कानपूर.
५. नाडगौंडे गुरुनाथ (२००३).'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
६. आगलावे प्रदिप (२००१),'सामाजिक मानवशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर.
७. चौधरी राजेश (संपादकीय) (२०११),'भारताचे संविधान' चौधरी लॉ पब्लीशर्स, पुणे.
८. भारत सरकार, (१९७३),'भारत का संविधान' विधी और न्याय मंत्रालय, नई दिल्ली.
९. जाधव तुकाराम आणि शिरापूरकर महेश (२०१०),'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया' खंड १-४, युनिक अकॅडमी, पुणे.
१०. देशमुख सुदर्शन (२००७),'आदिवासी समाजाचे दारिद्रच', निर्मल प्रकाशन, नांदेड.
११. मेहता प्रकाशचंद्र (२००६),'आदिवासी विकास एवं प्रथाएं' डिस्कवरी पब्लीशिंग हाऊस, नई दिल्ली.
१२. गारे गोविंद (१९९४),'आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन', अमृत प्रकाशन, औरंगाबाद.
१३. कुलकर्णी शरद, (२०००),'महाराष्ट्राती आदिवासी' आपटे प्रभा (संपादक). 'वनवासी विकास संकल्पना आणि दिशा' , वनवासी कल्याण केंद्र, मुंबई.
१४. महाराष्ट्र शासन नियोजन रोजगार हमी योजना,''महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना – महाराष्ट्रच व राज्य रोजगार हमी योजना". नवीन प्रशासकीय भवन, १६ वा मजला, मंत्रालय, मुंबई पृ. ३.
१५. आकरे., बी. एन. (२००९).'आदिवासी जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम" पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिकर्स, नागपूर प्रथम आवृत्ती, पृ. १०.
१६. लोकराज्य १ ते ८८
१७. कविमंडल., वि. (२००६), ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन: निती, कार्यक्रम आणि व्यूहरचना, मंगेश प्रकाशन, नागपूर.
१८. साळुंके द. आणि पवार ज. (१९८२), महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर.
१९. देसाई., सं (२००४), भारतासमोर सद्या प्रश्न आहेत तरी कोणते?, योजना.
२०. पेठे., व. प्र. (२००६), गरीबी निर्मुलन आणि आर्थिक विकास : २१ व्या शतकासाठी नवीन प्रतिमान, अर्थसंवाद.